THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 9TH JANUARY 1890.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

**हिंदुस्तानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आली जनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख १३ माहे डिसेंबर सन १८८९ रोजीं मंजूर केला तो सर्व लोकांस जाहिर होण्यासाठीं प्रसिद्ध केला असे:–**

### सन १८८९ चा आक्ट २० वा.

**सन १८५८ चा आक्ट ३६ वा हा सुधारण्याबाबत आक्ट.**

वेड्यांस घेण्यासाठीं व ठेवण्यासाठीं आश्रयस्थानें स्थापणें या संबंधानें व कोणत्याहि वेड्यास ब्रिटिश हिंदुस्तानांतील कोणत्याहि एका वेड्यांच्या आश्रयस्थानांतून दुसऱ्या कोणत्याहि वेड्यांच्या आश्रयस्थानांत पाठविणें यासंबंधानें गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा अधिकार वाढविणें ज्याअर्थी योग्य आहे, त्याअर्थी हल्लीं खालीं लिहिल्याप्रमाणें ठराविण्यांत येत आहे:—

सन १८५८ चा आक्ट ३६ वा, कलम १७ अ याऐवजीं नवें कलम दाखल करणें.

१. सन १८८६ चा आक्ट १८ वा (सन १८५८ चा ३६ वा आक्ट सुधारण्याविषयीं आक्ट) यावरून सुधारलेला सन १८५८ चा आक्ट ३६ वा (वेड्यांचे आश्रयस्थानांविषयीं आक्ट) याचें कलम १७ अ याच्या ऐवजीं खालीं दिलेलें कलम दाखल करावें. तें येणेंप्रमाणें:—

ज्या प्रांतांत असावीं तशीं अगर मुळींच आश्रयस्थानें नसतील त्यांबाबत ठराव.

"१७ अ. खालीं दिलेल्या दोन प्रसंगांपैकीं कोणत्याहि प्रसंगीं, ह्मणजे,—

(अ) कोणत्याहि एक्झिक्यूटिव्ह सरकारानें वेड्यांस घेण्यासाठीं व ठेवण्यासाठीं आपल्या हद्दींत सार्वजनिक आश्रयस्थान स्थापिलें नसेल तेव्हां,

(ब) तशा हद्दींत स्थापिलेलें कोणतेंहि सार्वजनिक आश्रयस्थान, त्या सरकारच्या अधिकाराखालच्या मुलुकांतील कोणत्याहि भागाच्या संबंधानें सोईच्या ठिकाणीं नाहीं अगर त्यांत असावी तितकी सोय, किंवा एकाद्या वर्गाच्या वेड्यांच्या संबंधानें योग्य सोय, होत नाहीं असें गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस दिसून येईल तेव्हां,

गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, सदर्हू एक्झिक्यूटिव्ह सरकारच्या हद्दीबाहेर ब्रिटिश इंडियाच्या कोणत्याहि भागांत असणारें कोणतेंहि आश्रयस्थान, सदर्हू हद्दींत हुकुमत

असणाऱ्या कोणत्याहि माजिस्ट्रेटास अगर जज्जास त्याच्या हुकुमतीच्या भागाकरितां या आक्टाअन्वयें स्थापिलेल्या आश्रयस्थानांत ज्याप्रमाणें वेडे किंवा एकाद्या वर्गाचे वेडे पाठविले येतात त्याप्रमाणें वेडे किंवा एकाद्या वर्गाचे वेडे अशा माजिस्ट्रेटानें अगर जज्जानें पाठविण्यासाठीं वेळोवेळीं नेमण्याचा अधिकार आहे.

सन १८५८चा आक्ट ३६वा, कलम १७ ब यापुढें नवीन कलम दाखल करणें.

२. सदरील सन १८५८ चा आक्ट ३६ वा याच्या १७ ब या कलमापुढें खालीं दिलेलें कलम दाखल करावें. तें येणेंप्रमाणें :—

वेड्यांस एका आश्रयस्थानांतून दुसऱ्या आश्रयस्थानांत पाठविणें.

"१७ क. या आक्टाअन्वयें स्थापिलेल्या अगर लैसेन्स दिलेल्या कोणत्याहि वेड्यांच्या आश्रयस्थानांतील कोणत्याहि वेड्यास कोणत्याहि एग्झिक्यूटिव सरकारच्या हुकुमावरून अशा सरकारच्या हद्दींतील तशा इतर कोणत्याहि आश्रयस्थानांत, आणि गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून ब्रिटिश इंडियाच्या कोणत्याहि भागांतील सदरील प्रकारच्या इतर कोणत्याहि आश्रयस्थानांत पाठविण्याचा अख्त्यार आहे."

सन १८५८ चा आक्ट ३६ वा याचें ११ वें कलम रद्द करणें.

३. सदरील सन १८५८ चा आक्ट ३६ वा याचें ११ वें कलम या कलमावरून रद्द केलें आहे.

(True Translation.)

Y. M. KELKAR,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.